महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३६ वे | दिनांक : २८/०१/२०२६ | वार : बुधवार

## मतदानापूर्वीच महायुतीचा गुलाल



**सिंधुदुर्ग** : राज्यातील १५ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अंतिम दिवस होता. या प्रक्रियेनंतर आता निवडणुकीच्या रिंगणातील अंतिम लढतीचे चित्र पूर्णपणे स्पष्ट झाले असून, राजकीय आखाड्यात खऱ्या अर्थाने प्रचाराचा धुरळा उडणार आहे. अर्ज माघारीच्या मुदतीनंतर आता प्रत्यक्ष निवडणुकीला सामोरे जाणाऱ्या उमेदवारांची यादी निश्चित झाली असून, सर्वच पक्षांनी आपापल्या बालेकिल्ल्यात मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.

दुसरीकडे, प्रत्यक्ष मतदानापूर्वीच महायुतीने कोकणात जोरदार मुसंडी मारत विजयाचे खाते उघडले आहे. तळकोकणात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या तब्बल २१ जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. तसेच रायगड जिल्ह्यातील महाड पंचायत समितीच्या सवाने धामणे गणातून महायुतीचे अनिल जाधव यांचीही बिनविरोध निवड झाली आहे. अशाप्रकारे महायुतीचे एकूण २२ उमेदवार निवडणूक लढवण्यापूर्वीच विजयी झाले असून, या यशामुळे सिंधुदुर्ग आणि रायगडमध्ये महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष साजरा केला आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत भाजपचे १९ तर शिवसेना शिंदे गटाचे २ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. जिल्हा परिषद मध्ये खारेपाटण जिल्हा परिषद उमेदवार प्राची इस्वालकर, बांदा जिल्हा परिषद उमेदवार प्रमोद कामत, पडेल जिल्हा परिषद उमेदवार सुयोगी घाडी, बापर्डे जिल्हा परिषद उमेदवार अवनी तेली, कोळपे जिल्हा परिषद उमेदवार प्रमोद रावराणे, किंजवडे जिल्हा परिषद उमेदवार सावी लोके या भाजपकडून बिनविरोध झाल्या आहेत. तर, जाणवली जिल्हा परिषद उमेदवार रुहिता तांबे या शिंदेंच्या शिवसेना उमेदवारही बिनविरोध निवडून आल्या आहेत.

तसेच पंचायत समितीमध्ये भाजपचे बिडवाडी पंचायत समिती संजना राणे, वरवडे पंचायत समिती सोनू सावंत, कोकीसरे पंचायत समिती साधना नकाशे, पडेल पंचायत समिती अंकुश ठुकरूल, नाडण पंचायत समिती गणेश राणे, बापर्डे पंचायत समिती संजना लाड, नाटळ पंचायत समिती सायली कृपाळ, नांदगाव पंचायत समिती हर्षदा वाळके, शिरगाव पंचायत समिती शीतल तावडे, फणसगाव पंचायत समिती समृद्धी चव्हाण, जाणवली पंचायत समिती महेश्वरी चव्हाण, आडवली मालडी पंचायत समिती सीमा परुळेकर, आसोली पंचायत समिती संकेत धुरी हे उमेदवार बिनविरोध झाले आहेत.

तर दोडामार्ग तालुक्यातील कोळझर पंचायत समितीच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार गणेशप्रसाद गवस यांची बिनविरोध निवड झाली आहे. या मतदारसंघातून शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार प्रवीण परब यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने गवस यांचा विजयाचा मार्ग मोकळा झाला. गणेशप्रसाद गवस हे सध्या शिंदे गटाचे दोडामार्ग तालुकाप्रमुख म्हणून कार्यरत असून, प्रत्यक्ष मतदानापूर्वीच मिळालेल्या या यशामुळे कोळझरमध्ये महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष साजरा केला आहे.

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत महाडमधून शिवसेना शिंदे गटासाठी विजयाचे शुभ संकेत मिळाले असून, सवाने धामणे पंचायत समिती गणातून अनिल जाधव यांची बिनविरोध निवड झाली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांच्या विरोधातील उमेदवारांनी माघार घेतल्याने जाधव यांचा विजय सुकर झाला. या यशामुळे शिंदे गटाने रायगडमध्ये विजयाचे खाते उघडले असून, मंत्री भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले यांनी शिवसैनिकांना पेढे भरवून या विजयाचा जल्लोष साजरा केला.

## शिवसेना संपवण्याची परवानगी द्याच, आम्हीही उत्तर द्यायला सज्ज

**मुंबई** : शिवसेना शिंदे गट आणि भाजपमधील अंतर्गत वाद आता चांगलेच वाढत जात असल्याचे दिसत आहे. भाजपचे नेते व मंत्री गणेश नाईक आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील वाद वाढत जात आहे. भाजपच्या वरिष्ठांनी जर परवानगी दिली तर यांचे नामोनिशाण मिटवून टाकू, असे नाईक यांनी म्हटले आहे. यावर आता शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना सविस्तर पत्र लिहिले आहे. बेताल वक्तव्य करणाऱ्या गणेश नाईक यांना आवरा अशी मागणी म्हस्के यांनी केली आहे. तसेच शिवसेनेचे नामोनिशाण मिटवून टाकण्याची परवानगी द्यावीच, आम्हीही उत्तर द्यायला सज्ज आहोत, असेही म्हस्के यांनी म्हटले आहे.

नरेश म्हस्के यांनी रवींद्र चव्हाण यांना पाठवलेल्या पत्रात असे म्हटले, पत्रास कारण की, नवी मुंबईतील आपले ज्येष्ठ नेते गणेश नाईक साहेब यांनी आपले मित्र पक्ष असलेल्या राज्य आणि अनेक महानगरपालिका नगरपालिकांमध्ये सत्तेत सहभागी असलेल्या, युती म्हणून लढून युती म्हणून जिंकून आलेल्या शिवसेनेला संपवण्याचा विडा उचलला आहे. एकेकाळी स्वतः शिवसैनिक असलेल्या गणेश नाईक साहेब यांनी आमचे प्रमुख नेते राज्याचे उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांना अनेक वेळा डिवचून नवी मुंबईतून शिवसेनेला धोबीपछाड देण्याचे, टांगा पलटी करण्याचे आणि शिवसेनेला नवी मुंबईतून मुळातून संपवून टाकण्याचे स्पष्ट इरादे अनेक प्रसारमाध्यमातून जाहीर रित्या मांडले आहेत. आता तर त्यांनी जाहीरपणे, पक्षाने परवानगी दिली तर शिवसेनेचे नामोनिशाण मिटवून टाकू, असे बेताल वक्तव्य केले आहे.

पुढे नरेश म्हस्के म्हणतात, मी तमाम शिवसैनिकांच्या वतीने आणि शिवसेना पक्षाच्या वतीने आपल्याला विनंती करतो की त्यांच्या ह्या त्यांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना शिवसेनेचे नामोनिशाण मिटवून टाकण्याची परवानगी द्यावीच. आमची तयारी आहे. खरे म्हणजे, महाराष्ट्रात महा बिघाडीची सत्ता उलथवून टाकण्यात, भारतीय जनता पक्ष आणि आदरणीय शिंदे साहेब या दोघांची मोठी भूमिका राहिली आहे. त्यानंतरच युतीचे सरकार महाराष्ट्रात येऊ शकले आणि आज कल्याण डोंबिवली ठाणे, मुंबई या ठिकाणी युती म्हणून लढत देऊन महानगरपालिका, नगरपालिकांच्या निवडणुकात आपण मोठे यश मिळवले आहे.

या सर्व निर्णयांमध्ये आपली ही सक्रिय भूमिका राहिली आहे. सगळीकडे युती असताना युतीतल्या मोठ्या घटक पक्षाबद्दल असे विधान करणे म्हणजे आपल्या पक्ष नेतृत्वावरच अविश्वास दाखवण्यासारखे आहे. एखाद्या व्यक्तीवरचा राग समजू शकतो परंतु, त्यासाठी पक्ष, पक्षीय भूमिका, पक्षाचा अजेंडा या सगळ्या बाबी धुडकावून लावत गणेश नाईक साहेब आमचे नामोनिशाण मिटवण्याचे वक्तव्य करीत आहेत, असे नरेश म्हस्के म्हणाले.

पुढे बोलताना नरेश म्हस्के म्हणाले, आदरणीय मोदीजींच्या आणि आदरणीय अमितभाई शहा यांच्या मार्गदर्शनाखाली एकनाथ शिंदे साहेब देवेंद्र फडणवीस साहेब दिवस रात्र काम करीत आहेत. काही बाबतीत विचार वेगळे असले तरी एक हिंदुत्ववादी, राष्ट्रीय विचारांचे स्थिर सरकार आपण त्यामुळेच देऊ शकलो आहोत. परंतु, त्यांना हे बघवत नसल्यानेच कदाचित ते अशी मागणी करत असावेत.

## अनावधानाने चूक, तर अनावधानाने मंत्रिपदही काढून टाका : प्रकाश आंबेडकर

**पुणे** : प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी त्यांच्या भाषणात संविधानांचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख टाळल्याने चांगलेच वातावरण तापले आहे. वाद चिघळल्यानंतर गिरीश महाजन यांनी आपण अनावधानाने नाव घ्यायचे विसरलो, असे स्पष्टीकरण दिले. आता यावर प्रतिक्रिया देताना वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी गिरीश महाजन यांची थेट मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. अनावधानाने नाव घ्यायचे विसरले, तर अनावधानाने मंत्रिपदही काढून टाकण्यात यावे, अशी टीका आंबेडकरांनी केली आहे.

गिरीश महाजन यांनी दिलेल्या स्पष्टीकरणावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, ज्या संविधानामुळे तुम्ही मंत्री झालात, ते संविधान कोणी लिहिले हेच जर तुम्हाला माहिती नसेल, त्यांचे नाव तुम्हाला घेता येत नसेल तर तुम्हाला पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, अशी टीका करत आंबेडकरांनी पदाचा राजीनामा देण्याची मागणी केली आहे.

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर देखील निशाणा साधला आहे. ते म्हणाले, आरएसएस नेहमीच दुतोंडी भूमिका घेते. एकीकडे आम्ही बाबासाहेबांना मानतो असे म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्या विचारांच्या विरोधात कृती करायची. हिंदू कोड बिलाला सर्वात आधी विरोध कोणी केला असेल तर तो आरएसएसनेच केला होता. मनुस्मृतीने महिलांना हिंदू धर्मात कोणताही अधिकार दिला नव्हता, ना मालमत्तेचा, ना वैयक्तिक, ना स्वतःच्या शरीराचा. हे सर्व अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिले. त्यामुळेच आज एक महिला अधिकारी (माधवी जाधव) जाब विचारण्यासाठी पुढे आली, असे आंबेडकर म्हणाले.

गिरीश महाजन यांनी आपण अनावधानाने नाव घ्यायचे विसरल्याचे म्हटले होते, यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, जर हीह चूक अनावधानाने झाली असेल, तर तुमचे मंत्रिपदही अनावधानाने काढून टाकण्यात यावे. ही काही छोटी-मोठी चूक नाही. तसेच ज्यांनी हे भाषण लिहून दिले त्यांच्यावर आणि ज्यांनी वाचले त्यांच्यावरही कठोर कारवाई झाली पाहिजे. महाजनांनी स्वतःच्या हाताने भाषण लिहिले असेल किंवा लिहून दिले असेल तरीही त्यांनी आंबेडकरांचे नाव वाचले नसेल, तर त्यांच्या कर्तव्यातील कसूर आहे, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी आंबेडकरांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## कालिकादेवी विद्यालयात प्राचार्य केशव भांगे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**(शिरूर कासार) :** दि.26 जानेवारी 2026 सोमवार रोजी,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, 'भारतीय प्रजासत्ताक दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी विद्यालयाचे, प्राचार्य केशव भांगे साहेब,यांच्या हस्ते,'राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर' यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले व सामूहिक राष्ट्रगीत तसेच महाराष्ट्र गीत आणि संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.विशेषतः महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार विद्यार्थी,पालक,शिक्षक व ग्रामस्थ यांनी कॉपीमुक्तीची सामूहिक शपथ घेतली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनीही कॉपीमुक्तीसाठी स्वतंत्र सामूहिक शपथ घेतली.याप्रसंगी आपल्या अभिभाषणातून प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी "26 जानेवारी" अर्थात भारतीय प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व विशद करून,विद्यार्थ्यांनी अभ्यासातून गुणवत्तेचे वेगळेपण दाखवून द्यावे.त्यासाठी कॉपीमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जावे,असा सल्ला दिला आहे.यावेळी शिरूर (का.)नगरपंचायतचे नगराध्यक्ष मा.रोहिदास पाटील गाडेकर, माझी नगराध्यक्ष दत्ता पाटील गाडेकर,माजी उपनगराध्यक्ष बाबुरावजी झिरपे, मा.गोविंदराव पाटील गाडेकर, नगरसेवक तथा माजी प्राचार्य वसंतराव काटे, प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे,व्यापारी संघटनेचे सर्वेसर्वा मा. बबनराव (तात्या) ढाकणे, नगरसेवक नसीरभाई शेख,नगरसेवक दादासाहेब हरिदास, पाणीपुरवठा सभापती प्रा.अक्षय रणखांब,गटनेते मा.गणेश भांडेकर,बांधकाम सभापती मा.अरूण भालेराव,नगरसेवक भीमराव गायकवाड, नगरसेवक अमोल चव्हाण, युवानेते युवराज सोनवणे, नगरसेवक गणेश तळेकर, नगरसेवक पंकज गाडेकर,माजी सरपंच आनंद जावळे, मा.कांता रणखांब,पत्रकार गोकुळची पवार,पत्रकार बबनराव देशमुख, पत्रकार आंगद पानसंबळ, पत्रकार प्रतिक भांडेकर,पत्रकार राज कातखडे, उपप्राचार्य प्रा. बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे, प्रा.महारुद्र डोंगरे व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील ठाकरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्याध्यापक यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला. गावकरी, विद्यार्थी यांनी राष्ट्रगीताच्या माध्यमातून मानवंदना दिली तसेच विद्यार्थ्यांनी गावातून रॅली काढून भारत माता की जय, वंदे मातरम, भारताचे संविधान भारताचे अभिमान, अशा विविध घोषणा देत होते, तसेच कार्यक्रमावेळी विद्यार्थ्यांनी गीत व भाषण केले. या वर्षी ७७ वा प्रजासत्ताक दिन जल्लोषात साजरा करण्यात आला. नृत्य ,गायन ,भाषण असे विविध संस्कृतिक कार्यक्रम शाळेत प्रजासत्ताक दिना निमित्त शाळेच्या वतीन घेण्यात आले. लहान मुलांच्या भाषणातून प्रजासत्ताक दिनाच महत्व आणी महापुरुषांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचं कार्य विद्यार्थ्यांनी केले. विद्यार्थ्यांनी आपल्या कला गुण आपल्या भाषण, कार्यक्रमातून दाखवून दिले,शाळेचे अध्यक्ष गणेश पवार उपाध्यक्ष वंदना मेंगाळ व सदस्य जयलाल जाधव,सोमनाथ घोंगते जनाबाई मधे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य बक्षीस देण्यात आले. त्याबद्दल गावकर्यांच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक लहाने, शिक्षक गालफाडे,भालेराव शिक्षिका श्रीमती घोरपडे, साबळे विद्यार्थी याचे ग्रामस्थांनी अभिनंदन,व कौतुक केले.या कार्यक्रमावेळी आशा सेविका घोगते,अंगणवाडी सेविका निर्मला राऊत,लता चाबुकस्वार गिता पारधे, सकुबाई मधे हिरामण मधे बाळू साळवे,वाळुबा मधे, विशाल पवार,शाम मधे,बाळू मधे, गणपत पारधे,सुनिल गावंडे, बबन कातवारे, भावराव मधे आदि ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विश्वकर्मा विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**कोळपेवाडी :** विश्वकर्मा प्राथमिक , माध्यमिक, इंग्लिश स्कूल शाळेत ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहण पंडित शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष एस.एस.पैठणे यांनी भूषविले प्रमुख पाहुणे म्हणून प्रदिप भाले,आवेज शेख, रमेश जोशी, एस. के. बच्छाव यांची उपस्थिती होती.यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, वेषभूषा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या वेळी वेदांत जाधव, अरहान बागवान, रुपाली श्रीनाथ, आरोही लाखुळे, असद शेख या विद्यार्थ्यांनी भाषण केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज मात्रे, गोपाल उगले यांनी केले. या वेळी संजय पगारे, साक्षी रोजेकर, नृसरत सय्यद, नाजेरा शेख, शितल मुरकुटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अनमोल सहकार्य केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


## ७७ व्या प्रजासत्ताक दिनी 'फ्लाईंग बर्डस' प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलचा पहिला वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संपन्न



**कन्नड :** ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा वरिष्ठ पोलीस अधिकारी संतोष जिबोले साहेब आणि मिसेस सुमंगली जिबोले मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. शाळेच्या पहिल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचे उद्घाटक- रामदास देशमुख , कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी- सौ.सुमंगली जिबोले , प्रमुख पाहुणे- सौ.आशाबाई शिंगारे या सर्वांच्या साक्षीने फ्लाईंग बर्डस प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलचा पहिलाच वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला. यात प्ले ग्रुपच्या अडीज वर्षाचा मुलांनी व्यासपीठावर येऊन आपला बेस्ट परफॉर्मन्स दिला. यावर कौतुकाची थाप द्यायला पालक वर्ग तसे समस्त साईबाबा कॉलनीतील समस्त गृहिणी उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांच्या तसेच सर्व महिलांच्या हस्ते मुलांना बक्षीस वितरण करण्यात आले. शिक्षिका- सौ.कल्याणी थोरात मॅडम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि शिक्षिका -सौ.रंजना वाल्डे मॅडम यांनी कार्यक्रमाचे आभार मानून कार्यक्रमाचा शेवट केला

## सत्यशोधक विद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**गोषेगाव :** सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. गावामध्ये प्रभात फेरी काढून प्रजासत्ताक दिनाच्या घोषणा देत जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष पर्यवेक्षक आय.एस.पठाण हे होते तर कासाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उंबरे सर, गोषेगाव चे सरपंच तुळशीराम पाटील मोहिते, युवा उद्योजक आप्पासाहेब घोडे, भारतीय सैन्यदलात कार्यरत असलेले ऋषिकेश मोहिते व मयुर फुलसुंदर, अमोल मोहिते, सूरज पवार हे हजर होते. ध्वजारोहण भारतीय सैन्यदलात (CISF)नुकतेच नियुक्त झालेले शाळेचे माझी विद्यार्थी ऋषिकेश मोहिते व विशाल फुलसुंदर यांच्या हस्ते करण्यात आले. तर शिक्षक श्री विजय कोलते यांच्या मार्गदर्शनाखाली स्काऊट गाईड मार्फत पथसंचलन करण्यात आले व ध्वजास मानवंदना देण्यात आली. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त भाषणे इंग्रजी, मराठी, हिंदी तून करत प्रकाश टाकला, शिक्षक श्री निलेश कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व धर्म समभाव हा मुकअभिनय १० वी तील विद्यार्थ्यांनी सादर केला. पर्यवेक्षक आय.एस. पठाण यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिन म्हणजे प्रजेच्या सत्तेचे राज्य म्हणजेच प्रजासत्ताक होय. तसेच आपले हक्क व कर्तव्य कोणती याबद्दल मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी आदिती कड या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रदर्शन ऋतुजा जाधव या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रम संपन्न होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष सुनीलजी वाकेकर संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, पदाधिकारी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## नगरपरिषद मुरूम येथे ध्वजारोहण सोहळा अत्यंत उत्साहात



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून नगरपरिषद मुरूम येथे ध्वजारोहण सोहळा अत्यंत उत्साहात आणि अभिमानाच्या वातावरणात पार पडला.नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष मा. बापूराव पाटील (काकासाहेब) यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. लोकशाहीच्या पर्वातील हे पहिलेच ध्वजारोहण असल्यामुळे नागरीकामधे कमालीचे चैतन्य होते.या मंगलसमयी काकासाहेबां समवेत उपस्थित राहून प्रसंगी तिरंग्याला वंदन करून उपस्थित सर्व नागरिक, पदाधिकारी आणि कर्मचारी बांधवांना प्रजासत्ताक दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी मुख्याधिकारी सचिनजी भुजबळ, माजी नगराध्यक्ष रशीद शेख, विद्यमान उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, नगरसेवक अमर भोसगे, गौस शेख, गणेश अंबर, रुपचंद गायकवाड, सौ. ढोबळे ताई, सौ. अंबुसे ताई, सौ. शेळके ताई, सौ.बनसोडे ताई, सौ. दुर्गे ताई, सौ. बंडगर ताई, सौ. कंटेकुरे ताई, सौ. बन्ने ताई, सौ. मुल्लाताई, सौ. गायकवाड ताई यांच्यासह नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते."लोकशाहीची मूल्ये जोपासण्याचा आणि मुरूम शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार आज आम्ही पुन्हा एकदा दृढ केला आहे."भारतीय संविधानाचा विजय असो..

## साक्षर भारत, समर्थ भारत; इकरा पब्लीक स्कूलमध्ये घुमला राष्ट्रभक्तीचा नारा



**जळगाव :** येथील इकरा पब्लिक स्कूलमध्ये 77 वा भारतीय प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. करीम सालार यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून ध्वजारोहण केले. सोहळ्याची सुरुवात पाहुण्यांना देण्यात आलेल्या सन्माननीय 'गार्ड ऑफ ऑनर'ने झाली, त्यानंतर इश्तियाक अहमद यांनी सर्वांना 'साक्षर भारत'ची सामूहिक प्रतिज्ञा दिली.यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेले शिस्तबद्ध पीटी ड्रिल, देशभक्तीपर गीते आणि प्रेरणादायी भाषणे उपस्थितांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरली,तर विद्यार्थिनींनी आपल्या कलागुणांतून प्रभावी कृती गीते सादर केली.आरिफ खान यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाची सांगता मिठाई वाटपाने झाली व,शाळा प्रशासनाने सर्व सहभागींचे आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


## देशभक्तीच्या रंगात रंगले ज्ञानेश्वर विद्यालय; बेगमपुऱ्यात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर** : बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालय येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपर वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यालयाच्या कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ सभागृहात आयोजित या सोहळ्यात विद्यार्थ्यांचा उत्साह आणि पालकांची उपस्थिती वाखणण्याजोगी होती. मान्यवरांची उपस्थिती आणि ध्वजारोहण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती डॉ. संध्या मोरे होत्या. यावेळी ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल पवार आणि पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर अध्यक्ष डॉ. संध्या मोरे यांच्या हस्ते सन्मानाने ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शनया प्रसंगी 'दशसूत्री' उपक्रमांतर्गत श्री. संतोष अधाने यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध काव्य संचालन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध ऐतिहासिक वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधले. मोहम्मद आतिक या विद्यार्थ्याने पियानोवर देशभक्तीपर धून वाजवून कार्यक्रमात रंगत आणली, तर अनेक विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते आणि प्रेरणादायी भाषणे सादर केली. माजी विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसादया सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या संख्येने उपस्थित असलेले माजी विद्यार्थी आणि पालक. शाळेप्रती असलेल्या आदरापोटी माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. सूत्रसंचालन आणि समारोप कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन श्री. संतोष अधाने व श्रीमती मंगला सुलताने यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून समारोप करण्यात आला.

## इंग्रजी भाषा ही रोजगार निर्मितीचे साधन - प्रा. डॉ. मनोजकुमार नवसे

**पाटोदा (प्रतिनिधी)** : इंग्रजी भाषा ही जागतिकीकरणात रोजगार निर्मितीचे प्रमुख साधन आहे! असे प्रतिपादन बंकटस्वामी महाविद्यालय, बीड येथिल इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. मनोजकुमार नवसे यांनी केले.ते इंग्रजी विभाग आयोजित "इंग्रजी भाषेतील रोजगार क्षमता वाढीसाठी आवश्यक कौशल्य" या विषयावरील व्याख्यानात व्याख्येते म्हणुन बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले कि इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे.ती जगात बोलली जाते. म्हणुन जगभरात रोजगार मिळण्यासाठी सर्वांना इंग्रजी भाषा बोलता आली पाहिजे. अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर हे होते.तर व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा इंग्रजी विभागाचे प्रा. विनोद किर्दक, प्रा. डॉ. सुनिल जाधव, प्रा. डॉ. वंदन जाधव यांची उपस्थिती होती. प्रस्ताविक प्रा. विनोद किर्दक यांनी केले. संचलन प्रा. डॉ. जाहेद सिध्दीकी यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी व्यक्त केले. या प्रसंगी इंग्रजी विषयाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## काहीच फरक पडत नाही

विझलं उद्याचं दिवाळं, रक्त सांडूनही मातीला,
इतकं सगळं होऊनसुद्धा — काहीच फरक पडत नाही.

रस्त्यावर झोपली स्वप्नं, काम गेलं, माणूस कोसळला,
पोटासाठी झुंज चालली तरी — काहीच फरक पडत नाही.

कागदांत अडकलं आयुष्य, मन रांगेत उभं राहिलं,
हक्क शोधत भटकत राहिलो तरी — काहीच फरक पडत नाही.

शेतात घाम, हाती कर्ज, स्वप्नांचा आधार तुटला,
बाप मरतो, शेत ओस पडलं तरी — काहीच फरक पडत नाही.

मत हरवलं, आवाज हरवला, लोकशाही गुदमरते आहे,
सत्य ओरडून सांगितलं तरी — काहीच फरक पडत नाही.

शिकायचं होतं माणूसपण, पसरवला गेला द्वेष फक्त,
बुद्धीला बेड्या घातल्या तरी — काहीच फरक पडत नाही.

संशयावर माणूस मारला, झुंडीचा न्याय माजला,
माणुसकीच मरून गेली तरी — काहीच फरक पडत नाही.

सीमेवर प्राण अर्पण झाले, प्रश्न विचारणं गुन्हा ठरलं,
फक्त घोषणांचा गजर झाला तरी — काहीच फरक पडत नाही.

स्त्रीचं दुःख रोजचं झालं, भय घराघरात पसरलं,
न्याय मागणं गुन्हा ठरलं तरी — काहीच फरक पडत नाही.

"लोकगाथा" म्हणते शांतपणे, आरसा पाहा एकदा तरी,
भारतीयत्व हरवलंय — म्हणूनच — काहीच फरक पडत नाही.

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर

## बहुगुणी नारळ

ओला नारळ
बाबांनी आणला
एका दमात
दादाने फोडला

घोट घोट पिले
सर्वांनी पाणी
आनंद झाला
सर्वांच्या मनी

गोड मोदक
बनवी आई
वड्या करण्याची
ताईला घाई

खोबऱ्याची आमटी
आजोबांना प्यारी
भातावर टाकून
संपवी सारी

भाजीत टाकायचे
खोबरं कुटून
यथेच्छ जेवायचे
बोटं चाटून

आजाऱ्यांना अमृत
नारळाचे पाणी
आपल्या जीवनात
नारळ बहुगुणी



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## जीवन विकास ग्रंथालय, टिळकनगर, छत्रपती संभाजीनगर येथे ७७ व्या गणराज्य दिनाचे ध्वजवंदन



**छत्रपती संभाजीनगर** : जीवन विकास ग्रंथालय, छत्रपती संभाजीनगर येथे ७७ व्या गणराज्य दिनाचे ध्वजवंदन ग्रंथालयाचे नियमित वाचक, कलावंत आणि हितचिंतक श्री राजेंद्र जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष न्या. अंबादासराव जोशी यांनी त्यांचा सत्कार केला. राजेंद्र जोशी यांनी मनोगतात ग्रंथालयाशी असलेल्या नात्याबाबत आणि त्यांच्या वाचन दृष्टीबद्दल माहिती दिली. तसेच त्यांनी ग्रंथालयाला ग्रंथभेट दिलेल्या ग्रंथांची वैशिष्ट्ये सांगताना त्यांचे वाचनानुभव सांगितले. याप्रसंगी राष्ट्रगीतासोबत वंदे मातरम् या राष्ट्रगानाचे पठण आणि त्यावरील हिंदी गीताचे वाचन श्री व सौ. मिलिंद देशपांडे आणि अजित देसाई यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजशेखर बालेकर यांनी आणि आभार नृसिंह कुलकर्णी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य जीवन देसाई, डॉ. विजय पांगरेकर, श्री व सौ. चिमणपुरे, माधव देशपांडे, प्रवीण मंडलिक, वसेकर, माधवराव कुलकर्णी, श्री व सौ. साबु, अशोक लाटे. विशाल आर्वीकर, सौ. प्रीती अंकुशे, लक्ष्मण मोरे, कांतीलाल जाधव आणि परिसरातील वाचक नागरिक बहुसंख्येने उपस्थिती होते.

## दौलताबाद ग्रामपंचायत मध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा



**दौलताबाद (जावेद अहमद)** : दौलताबाद ग्रामपंचायत येथे सकाळी ग्रामपंचायत सरपंच शबाना करीम शेख यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. मध्यवर्ती सहकारी बँक दौलताबाद येथे विस्तार अधिकारी प्रकाश तुपे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. देवगिरी शाळा येथे मुख्याध्यापक इश्वर पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र येथे वैद्यकीय अधिकारी वाकोदकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे ग्रामपंचायत सदस्य किशोर जाधव, योगेश पांढळे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठित नागरिक, सर्व शिक्षक, ग्रामस्थ, विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थित होते.


## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


## उपनिरीक्षकाचे प्रजासत्ताक दिनी झेंड्याला मान वंदना वेळी हृदयविकाऱ्याच्या झटक्याने निधन



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** देशाचा 77 वा प्रजासत्ताक दिन संपूर्ण देशात उत्साहात साजरा होत असतानाच उमरगा शहरात एक अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी घटना घडली. राज्य उत्पादन शुल्क विभागात कार्यरत असलेले दुय्यम निरीक्षक (पीएसआय) मोहन भीमा जाधव यांचे झेंडावंदनाच्या वेळी कर्तव्य बजावत असतानाच आकस्मिक निधन झाले.26 जानेवारी रोजी सकाळी उमरगा येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त झेंडावंदनाचा कार्यक्रम सुरू होता. अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवर उपस्थित असतानाच झेंडावंदन सुरू असताना पीएसआय मोहन जाधव यांना अचानक चक्कर येऊन ते खाली कोसळले. तत्काळ लक्षात आले की त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आहे.खाली पडताना त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपस्थित कर्मचाऱ्यांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्यात आली. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती मोहन जाधव यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या घटनेनंतर आनंदाच्या वातावरणात क्षणातच शोककळा पसरली.विशेष बाब म्हणजे, अवघ्या सहा महिन्यांपूर्वीच जाधव यांना पीएसआय पदावर पदोन्नती मिळाली होती. त्याआधी ते सोलापूर येथे राज्य उत्पादन शुल्क विभागात कार्यरत होते. प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त आणि कर्तव्यदक्षतेचा आदर्श निर्माण केला होता.सहकारी अधिकाऱ्यांच्या मते, मोहन जाधव हे अत्यंत शांत स्वभावाचे, संयमी आणि सर्वांना मदतीसाठी तत्पर असणारे अधिकारी होते. कार्यालयातील अनेक कर्मचाऱ्यांसाठी ते मार्गदर्शक आणि आधारवड होते."ते कधीही आवाज न चढवता काम समजावून सांगत. प्रत्येकाशी आपुलकीने वागत. आज आम्ही केवळ अधिकारी नव्हे, तर एक चांगला माणूस गमावला आहे," अशा शब्दांत सहकाऱ्यांनी भावना व्यक्त केल्या.कर्तव्य बजावत असतानाच, देशाच्या प्रजासत्ताक दिनीच आलेले हे निधन संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेसाठी मोठा धक्का मानला जात आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, मित्रपरिवार तसेच नागरिकांकडून तीव्र शोकसंवेदना व्यक्त केल्या जात आहेत.पीएसआय मोहन भीमा जाधव यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार असून, त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.कर्तव्यनिष्ठ अधिकारी देशसेवेतच हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत असून, प्रजासत्ताक दिनी झालेली ही घटना कायमस्वरूपी दुःखद आठवण ठरणार आहे.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर 76 वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. यावेळी प्रा.डॉ.उमाकांत सूर्यवंशी यांनी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून भारतीय राज्यघटने विषयी सर्वांना संबोधित करताना म्हणाले की ,भारतीय संविधान हे जगभरातील अत्यंत सर्वांग सुंदर संविधान असून शिव, फुले ,शाहू आंबेडकर यांचे समता स्वातंत्र्य व बंधुतावादी विचार यात प्रतिबिंबित झाले आहेत, संत साहित्य व त्यांचे विचारधन हे यात प्रतिबिंबित होताना दिसते. मानवी मूल्य व माणूस सर्वोच्च मानून भारतीय संविधानाचे संरचना झालेली आहे .या देशात नदी ,नाले ,डोंगर ,नैसर्गिक साधन संपत्ती महत्त्वाची आहेच परंतु या सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणजे माणूस होय .माणसाला केंद्रभूत मानून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेवर आधारलेला सर्वांना समान न्याय व हक्क प्रदान करणारा सर्वोच्च अधिकार भारतीयांना दिला. त्यामुळे भारतीय संविधान हे आपल्यासाठी सर्वश्रेष्ठ असून प्रत्येक नागरिकांनी आपल्या कर्तव्याबरोबर आपल्या अधिकाराबाबत जागरूक असणे गरजेचे आहे .डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला लोकशाहीची केवळ रचनाच दिली नाही, तर त्या रचनेत स्वातंत्र्य, समता,बंधुता,न्याय या मूल्यांचा अंतर्भाव आवर्जुन केला, जेणेकरुन लोकशाही बळकट होईल. प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळेल, न्याय मिळेल,देशात समता बंधुता नांदेल, प्रजासत्ताक दिनाचे महत्व वाढेल.आपले संविधान हे भारत देशातील " प्रत्येक नागरिकाचे कवचकुंडल"आहे.म्हणुन संविधान टिकविणे,संविधानाला जपणे आपले आद्य कर्तव्य आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घालुन दिलेल्या संविधानातील मुल्यांनुसार प्रत्येकाला चालावे लागेल तर आणि तरच लोकशाही टिकेल आणि खऱ्या अर्थाने भारत प्रजासत्ताक देश राहील,असे प्रतिपादन केले.त्याचबरोबर गेल्या १४ जानेवारी ते २८ जानेवारीपर्यंत महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जातो.या दरम्यानच्या काळात विविध उपक्रम राबविले जातात.विविध स्पर्धा आणि व्याख्यानाची श्रृंखला आयोजित केली जाते.त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी आपण २६ जानेवारीला यशस्वी मराठी माणसाचे कौतुक आणि विशेष सन्मान केला जातो.त्यामुळे गुंजोटी पंचक्रोशीतील साहित्यिक ,यशस्वी मराठी भाषिक,विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असणाऱ्या मराठी माणसांचा प्रजासत्ताकदिनी सत्कार ठेवलेला असतो. यावर्षीही वीरश्री पद्माकर देशपांडे व आयु.पांडुरंग खमीतकर यांचा यथोचित सत्कार व बहुमान संस्थेचे संस्थेचे सचिव ,संस्थेचे उपाध्यक्ष आणि संचालक मंडळाच्या उपस्थितीमध्ये डॉ. दामोदर काका पतंगे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.आर.एन.निगडे यांनी केले., तर आभार डी.पी. चव्हाण यांनी मांडले .सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधान प्रदान करत असलेल्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण संस्थेचे मा. संचालक डॉ. सागर पतंगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन व तंबाखू मुक्त होण्याची शपथ घेण्यात आली. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी , सर्व शाखांचे प्रमुख, गुंजोटी गावातील प्रतिष्ठित नागरिक , महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक , प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल मध्ये भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा





**छत्रपती संभाजीनगर :** येथे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहण डॉ नागरे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रगीत झाल्यावर , लेझीम पथकाने कवायत सादर केली संगीत कवायत झाली, प्रमुख पाहुणे मार्गदर्शन केले. आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री संतोष भाऊ हिवाळे पाटील यांच्या तर्फे विद्यार्थ्यांना खाऊ (बिस्कीट) वाटप करण्यात आले प्रमुख पाहुणे सौ. निलमताई वडोदे, श्री विठ्ठल देशमुख सर व्यंकटेश बालसदनचे अधिक्षक, तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री गांवडे व्ही के, जेष्ठ शिक्षक श्री संभाजी भोसले, श्री खैरे डी व्ही, सचिन घुले, हिरासिंग पडवाल, जुबडे,धनवे सर, गायकवाड सर, सौ. पुष्पा पवार मॅडम, अनुराधा बोराडे, विजया दारुन्टे, मॅडम, याप्रसंगी उपस्थित होते, विद्यार्थी मित्रांनी भाषणे केली. तर देशभक्ती गीतावर नृत्य सादर केले. गीत गायन केले. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित क्रीडा सप्ताहामध्ये प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. या प्रसंगी श्री सचिन शिंदे सरांनी सुत्रसंचलन केले, तसेच संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जानकिराम मनगटे सर यांनी केले. विविध स्पर्धा परीक्षा मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले.बालवर्ग ते दहावी, काही विद्यार्थ्यांनी इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेत भाषणे केली, विविध वेशभूषेत विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते पालक मोरे, साहेब, गायकवाड, राठोड, चव्हाण, जाधव, देशमुख, शिंदे, शाळेचे इतर कर्मचारी संतोष बोडखे, राजु बारसे, जाधव मावशी उपस्थित होते.सकाळी प्रभात फेरी संपूर्ण परिसरात घोषणा देत फलक, घेऊन प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत लेझीम पथकाने व ढोल पथक घेऊन प्रसन्न वातावरण प्रभात फेरी काढण्यात आली. मोठ्या उत्साहात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


## उमरगा येथे भव्य नाट्यगृहाची उभारणी व्हावी - नाट्यपरिषदेचे अध्यक्ष प्रा. गुरुप्पा शेटगार यांची मागणी



**उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे)** कर्नाटक आणि आंध्रप्रदेश यांच्या सीमारेषेवर उभे असलेले उमरगा हे शहर तसे तालुक्याचे ठिकाण . उमरगा आणि परिसरात अनेक नाट्यकलावंत आणि साहित्यिक आहेत. दोन्ही राज्याच्या सीमेलगत असलेला हा बहुभाषिक तालुका आहे. बहुभाषिक असूनही इथे विविधतेत एकतेचे दर्शन घडवित मराठीची प्राणपणाने जोपासना केली जाते. नामांकित अशा विविध व्याख्यानमाला इथे वर्षानुवर्ष राबवल्या जातात. आजघडीला सर्वार्थाने शासन दरबारी हा तालुका दुर्लक्षित असला तरी विविध क्षेत्रात उभारी घेताना दिसतो आहे. आजघडीला विविध संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या आपल्या विविध लोककला, व नाट्यकला यांचा ऱ्हास होऊन त्या लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. लोककला नाट्यकलेची फार मोठी परंपरा या तालुक्याला आहे. पूर्वी रात्र, रात्र नाटके, मेले, व लोककलेचे सादरीकरण होत असत, असा दैदिप्यमान इतिहास असूनदेखील या कलांना घर घर लागण्यामागे अनेक कारणे असले तरी यामागचे मुख्य कारण म्हणजे मुंबई पुण्याच्या धर्तीवर मिळणाऱ्या सुविधांचा अभाव हेच आहे. सद्य परिस्थितीत प्रेक्षकांना उघड्यावरील प्रेक्षागृहाविषयी असलेली उदासीनता होय. मुंबई पुण्यापेक्षा दर्जेदार लोककलावंत , लेखक ,कवी, दिग्दर्शक, आणि अभ्यासक असले तरी त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध नसल्याने अनेक कलावंत अस्वस्थ आणि हवालदिवाल झालेले आहेत. त्यामुळे उमरग्याचे आमदार प्रवीण स्वामी यांच्याकडे उमरग्यात नाट्यगृहाची उभारणी करून , एक हक्काचे व्यासपीठ उभा करून नाट्यकलावंत यांची होणारी परवड थांबवावी अशी विनंती उमरगा नाट्यपरिषदेचे अध्यक्ष प्रा. गुरुप्पा शेटगार यांनी आमदार महोदयांकडे केली आहे. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, प्रा. शेटगार यांचे निवेदन स्वीकारले आहे.

## बाबुराव पा. औराळकर विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



**कन्नड (अरुण थोरात) :** कळंकी ता. कन्नड येथील बाबुराव माणिकराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. यानिमित्त गावात प्रभातफेरी काढण्यात आली . विद्यार्थांनी गणवेशात संचालन केले. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्देशाने विद्यार्थीनींनी महाराष्ट्रीय आकर्षक पेहराव परिधान केला होता. गावात विविध घोषणांनी परिसर दणानुन गेला होता. यानंतर प्रथम ग्रामपंचायत कार्यालयात ध्वजारोहन करण्यात आले. मुख्याध्यापक मुक्तानंद गोस्वामी यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करून ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाषणे, गाणी आणि नृत्य सादरीकरण केले. त्यास गावकऱ्यांनी उत्साहपूर्वक दाद देवून बक्षिसे दिली. विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला, धनश्री थोरात व आदिती थोरात यांनी अप्रतिम समावलोचन केले. याप्रसंगी शाळेचे शिक्षक गणेश दारवंटे यांनी उपस्थितांचे आभार मानले, शिक्षक नानासाहेब निंभोरे, कल्याण पवार, रविंद्र थोरात, संजय वारे, बळीराम राठोड, शशिन जाधव सह पालक,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षक व पालकांची भूमिका महत्वाची - प्रा. डॉ. शिवाजी हुसे



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जि .प.प्रा. शा. धनगर वस्ती येथे सांस्कृतिक कार्यक्रम , हळदीकुंकू स्नेहमिलन आणि बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन शिवाजी महाविद्यालय कन्नड येथील प्रसिद्ध कवी, व्याख्याते तथा तिफणचे संपादक प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांच्या हस्ते करण्यात आले .तसेच, संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या प्रेरणेतून दशसूत्री अंतर्गत लेखक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षक व पालकांची भूमिका " या विषयावर प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांनी व्याख्यान दिले. ते बोलताना म्हणाले की, पालक स्वतः मुलांपुढे आरसा असतात , आईवडिलांचे अनुकरण ते करतात. त्यामुळे मुलांना महत्वाच्या कार्यक्रमास व इतर ठिकाणी सोबत नेलं पाहिजे. तसेच मुलांना काही नाही होता आले तरी चालेल पण एक चांगला "माणूस "मात्र नक्कीच बनवा. असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षक व पालकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. असे प्रतिपादन डॉ. हुसे यांनी केले. फुलंब्री येथील श्री संतोष नागरे यांचा "अॅग्रोवन दिवाळी अंक" सकाळ मुखपृष्ठावर छायाचित्र आल्यामुळे त्यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला.शाळेची विद्यार्थिनी इ. दहावीला गुरुकुल येथे ९२ % मिळवून पहिली आलेल्या स्नेहल ढंगारे व तिच्या पालकांचा नागेश ढंगारे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर नंदिनी लेणेकर हिचा देखील "भारत माता " शाळेत दुसरा नंबर येऊन तिने दहावीला 89% टक्के गुण मिळवले त्याबद्दल तिचाही पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला . याप्रसंगी कार्यक्रमाला फुलंब्री केंद्राचे केंद्रप्रमुख पंडित भोसले, युवा प्रशिक्षणार्थी ऋतुजा सोनवणे ,शा. व्य. स. अध्यक्ष संजय जानराव, गिरजाराम जानराव, अंबादास जानराव, कडुबा जानराव ,भीमराव सोनवणे ,अमोल, रघु,उर्मिला हुसे , शिक्षिका वृषाली वाघ ,सुनीता सावळे ,राज्यश्री धटिंग, यांच्यासह माधुरी काथार, गंगुताई जानराव आणि वस्तीवरील सर्व पालक व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली सोनवणे आणि मीनाक्षी जानराव यांनी केले.

## छत्रपती संभाजीनगरच्या पर्यटन विभागाचा नांदेडमध्ये गौरव; राज्यस्तरीय मंचावर मिळाला बहुमान



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** महाराष्ट्र शासन आयोजित अल्पसंख्याक विकास विभाग राज्यस्तरीय समितीने नांदेड येथे "हिंद की चादर "श्री गुरु तेग बहादूर साहिब जीं यांच्या 350 व्या शहिदी " समागमचा भव्य कार्यक्रम शनिवार, रविवार,दिनांक 24, 25 जानेवारी 2026 रोजी आयोजित केला होता.या समागमात देश-विदेशातील लाखो च्या संख्येने सर्व हिंदू धर्मीय भाविक व भक्त उपस्थित होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पर्यटन संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्य कक्षेत असल्यामुळे येथील पर्यटन उपसंचालक माननीय श्री विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली.जिल्हा पर्यटन अधिकारी: शेख आजिमुद्दीन, जिल्हा पर्यटन अधिकारी: शोएब शाह व पर्यटन सहायक: डॉ.शिवाजी गायकवाड यांना पर्यटन विभागाच्या आई, कृषी पर्यटन, होम स्टे अशा विविध योजनांची माहिती व प्रचार प्रसारासाठी पर्यटन विभागाचे प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात आले होते. त्यात त्यांनी आपापल्या विभागाच्या योजनाची उत्कृष्टपणे माहिती देऊन सादरीकरण केल्यामुळे हिंद-दि-चादर उत्सवाच्या मंचावर मंत्री, आमदार, खासदार,शासकीय अधिकारी, सचखंड गुरुद्वारा समिती व महाराष्ट्र शासन, मुख्यमंत्री कक्षाचे अधिकारी, पदाधिकारी यांच्या समक्ष उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल स्मृती चिन्ह, शॉल देऊन सन्मानित करत अभिनंदन केले.त्यानंतर महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या या उपक्रमाची व योगदानाने पर्यटन विभागाची प्रतिमा उंचावली आहे.तशी नोंद सदर कार्यक्रमातील नोंद वहीत करण्यात आली आहे.महाराष्ट्र पर्यटन विभाग महाराष्ट्र शासन योजना स्टॉल कक्षाला हजारो महिलां, पुरुष, विध्यार्थी, शेतकरी, सरकारी, कर्मचारी यांनी भेटी दिल्या व योजनाची माहिती करून घेतली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


## गेली लोकशाही कुणी कडे

स्वार्था मागे नेता पळे
नेता मागे कार्यकर्ता पळे
कार्यकर्ता मागे जनता पळे
गेली लोकशाही कुणी कडे.

मतदानासाठी नका शिवू
चिकन, मटन अन दारू
मतदानासाठी नका घेवू
पैसा अडका अन वस्तु
भ्रष्टाचाराचा मिळेल चटका
त्यातून होणार नाही कधी सुटका
अन खरं सांग मित्रा
कशी होईल पक्की
लोकशाहीची मुळे
गेली लोकशाही कुणी कडे.

पांच वर्षात नेत्याचे हात
असतात मलाई अन तुपात
आपण असतो कटोरा घेवून
लाचार उभा नेत्याच्या दारात
सत्तेच्या शहाणपणात
मतदार ठरतो त्यांचा मोहरा
अशानेच होती लोकशाही खिळखिळी
गेली लोकशाही कुणी कडे.

स्वार्था मागे नेता पळे
नेता मागे कार्यकर्ता पळे
कार्यकर्ता मागे जनता पळे
गेली लोकशाही कुणी कडे.


**प्रा. जयवंतराव श्रीराम पाटील**
म. ज्यो. फुले उमावि, पिशोर
ता. कन्नड़ जि. छत्रपती संभाजीनगर
९९२१५८८७८४


# किनगाव राजा येथे जिल्हा परिषद शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**बुलढाणा (महेश मुंढे) :** किनगाव राजा येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये 26 जानेवारी रोजी भारताचा 77 वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शाळा समितीचे अध्यक्ष श्री. इसाक कुरेशी यांच्या हस्ते फटाक्यांची आतषबाजी करत ध्वजारोहण करण्यात आले.

यानंतर महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन शाळा समिती अध्यक्ष श्री. इसाक कुरेशी यांच्या हस्ते, तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच श्री. प्रकाश मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांनी राष्ट्रगीताचे सामूहिक गायन केले तसेच भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले.प्रजासत्ताक दिनाच्या औचित्याने सकाळी संपूर्ण गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. लहान चिमुकल्या विद्यार्थ्यांनी हातात राष्ट्रीय ध्वज घेऊन देशभक्तीच्या घोषणा देत गाव परिसर दुमदुमून टाकला. या प्रभात फेरीमुळे नागरिकांमध्ये देशप्रेम व राष्ट्रीय एकतेची भावना अधिक बळकट झाली.कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी भाषणे, नृत्य व देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विविध मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत टाळयांच्या गजरात रोख बक्षिसे देऊन त्यांना प्रोत्साहन दिले.या कार्यक्रमात किनगाव राजा येथील अंगणवाडीतील मुले-मुली, अंगणवाडी सेविका व मदतनीस, तसेच पालक वर्ग, महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शाळा समितीचे उपाध्यक्ष व शालेय शिक्षण समितीचे सदस्यही उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.कार्यक्रमाचे औचित्य साधून नितीन सानप यांनी आपल्या चिरंजीव ओम सानप यांच्या 26 जानेवारी रोजीच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप केले. तसेच शाळा समिती
अध्यक्ष श्री. इसाक कुरेशी यांनी विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करून आनंद द्विगुणित केला.या यशस्वी कार्यक्रमासाठी केंद्रप्रमुख श्री. गैबी नंद घुगे, मुख्याध्यापक श्री. शिवकुमार वाघ, शिक्षक श्री. अनंथा माथने, श्री. राधाकिसन खारडे तसेच शिक्षिका सौ. अनिता खरात, सौ. संगीता काकड, सौ. वर्षा शेळके व सौ. मीरा पवार यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमामुळे शाळा परिसरात देशभक्तीचे, उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व नवचैतन्य दिसून आले.

# कोलाहलाची क्षणचित्रे : आत्मिक चिंतनाचा भोवताल




**क**वीस्नेही लवकुमार मुळे याचा'कोलाहलाची क्षणचित्रे'हा कवितासंग्रह म्हणजे आत्मिक चिंतनाची भावबंध कविता आहे.या कवितेचा आत्मा गेयता लयदार लयीचा शब्दांनुबंध आहे.मनाच्या चिंतनात मग्न कोलाहल सतत संघर्षरत असल्याने चिंतनाची चित्र सुखद,दु:खद भाव व्याकुळ होऊन ही कविता निर्लेप नितळ श्रेध्दय भावनेतून येते.कवी हा या सभोवतालचे क्षण शब्दबद्ध करण्यांत घनव्याकुळ होऊन मुक्त आशयघन शब्दांने व्यक्त करतो जसे " गेले सरून आयुष्य,उरे हाती मरगळ खपलेल्या शरीराची, झाली कशी पानगळ जपलेल्या नात्याची,कुणा मोजदाद नाही."(पृष्ठ 16)एक चिंतनाची सुरेख लय,आशयघनता सृजन भक्तीने क्षणचित्रे उजागर केली आहे.या समसृष्टीच्या कोलाहलाची अतिशय तरल सुक्ष्म निरिक्षण म्हणजे ही क्षणचित्रे होय.जगण्याच्या पसाऱ्यात कवी एक सृजनशील दृष्टीने आपल्या सभोवतालचे क्षण शब्दबद्ध करतो.या वठलेल्या,जिर्ण झालेल्या झाडाला ही नव्याने फुटवे फुटावेत आणि पुन्हा नव्याने झाडाचं झाडपण सिध्द करावंही जशी माय मातीच्याच उदराची अद्वैत अदम्य् इच्छा आहे.मातीशी कायमचं नाळ बांधून झाडं सुखाची सावली देतं.व या भूतळी मातीचा मृदगंध कायमचं अबाधित ठेवतो पण इथल्या रासायनिक खतांची भयंकर भयमारी या ऋतूचक्राची चक्क चक्रीच फिरून ठेवल्याने या सृष्टीच्या कोलाहलात मरणयातना भोगाव्या लागता आहेत.हे चिंतन चिकित्सक काव्य आशय संपन्न झाले आहे.कविता ही आत्मारंगी काळजाचा ठाव आहे.शब्दांची निखळ निर्व्याज सत्य शिदोरी घेऊन सृजनशीलतेची बांधनी कविते केली आहे.गाव,लिहितो दोस्ता,धग,खोल मनाच्या तळाशी, साचेबंद तळातला अंधार, तप्त उन्हाच्या झळा, असे रक्त भिनलेले, संवाद परिघ,विराणी,दिशा शोधता दाही,पागुळपावा या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे माणसाच्या वर्मावर तिरकसपणे मार्मिकतेने केलेला कल्लोळाचा कोलाहल मांडला आहे.सातबारा नव्याने,लिहिला दवाने,'भुई'पण शाईने आटलेली'.ही सखेद भावना व्यक्त होताना हा सृजन समर्पक कोलाहल मन गहिवरून टाकतो कवी लिहितो, "सुचते काही रेशीमबधाची अतुट नाती भाऊबंदकीने रक्ताळलेली लाल-काळी माती"(पृष्ठ 36) हे सनातन वेदनाची धार निर्धार पुर्वक येते.हा कल्लोळ थांबला नाही.मनाचे फर्दाडलेपण की,मनाचे संचित अजून ही आहे तसेच आहे.ही मातीच्या उन्मळून जाणारे सृजन भावनेची कविता.माती ही मातृत्वाचे डोहाळे देते.मातीचे मोल अनमोल आहे.ती हिरवाईचं ममत्व देते.लवकुमार मुळे यांच्या कवितेने हा मातृत्वाचा अनुबंध बांधला आहे.गीतकार बाबासाहेब सौदागर पाठराखण करताना लिहितात,"संपुर्ण बालपण राना शिवारात गेल्यामुळे शहरी माणसांना माहीत नसलेल्या झाडापक्षांच्या प्रतिमा आणि कविता अतिशय अप्रतिम सुंदर आहेत.समीक्षक चाकोरीबद्ध अभ्यास करीत आहेत.अशा चांगल्या दर्जाची कविता वाचकांच्या मनात मात्र आनंद लहरी निर्माण करतात.अतिशय संवेदनशील आणि सृजनशील कवी असलेले लवकुमार मुळे यांच्या भोवती असलेल्या परिस्थिती मुळे हा भोवताल चित्रातून कोलाहल दिसून येतो.(मलपृष्ठ मजकूर) म्हणून ही कविता ग्रामीण वास्तवाचे मनस्वी चिंतन चित्रण करते.'सावधान पाणी पेटते आहे' या कवितेमधून ते लिहितात, "कष्टकऱ्यांच्या घामाची, किंमत चुकते आहे कुणब्यांची वाणी, आणीबाणीत झडते आहे जीवदशाही मानवाची,केवीलवानी दिसते आहे निसर्गाच्या अंकातील, लाल रक्त फुलते आहे" (पृ. 45)ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल ठणक मांडताना दिसते.कवी लवकुमार मुळे यांच्या सृजनशील भावनेचा ओलावा कायमचं आपल्या गाव शिवाराशी अतुट नात्यांनी गुंफलेला असल्याने ही कविता तरल गेयता घेऊन येते.या कवितेने'गुढी' उभारली आहे.तर 'आबा तुमी हुता तवा', बाई, आयुष्य, ढगफुटी, पाऊस,धुके धुसर, वर्तमान, जगण्याची आस, चिंता,भयकंप,भविष्य, या कवितेमधून मनाचं सोज्वळ नितळ निर्लेप निस्पृह झऱ्यासारखे अभिव्यक्त झालेले कोलाहलाचे चित्रं दिसून येते.या कवितेचा मर्मग्राही अनुबंध हा प्रस्तावनेत सशक्तपणे आलाआहे सौ.मेघना पाटील लिहितात "कवीवर्य लवकुमार मुळे याची कविता गावगाड्याच्या विखुरलेपणाची सल व्याकुळ आर्ततेने ठाई ठाई चितारते.मानवी जीवनासंबधीचे चिंतन आणि मूल्यांवरील श्रध्दांचे आविष्करण या कवितेत अवतरते.गोळीबंध शब्द आणि सूचकतेतून अर्थाची वलयेविस्तारीत नेताना, सामान्य रसिकाला दुर्बोध वाटावी अशी ही कविता वास्तवाला जखडून राहते.अस्वस्थ भोवतालशी नाते जोडतं आपल्या अस्सल अनुभवांना नव्या रूपात साकारते.(पृष्ठ 12)अशी ही कोलाहलाची व्यथांग चित्रं शब्दांकित करणारी कविता अतिशय आशय संपन्न सृजन अंतरंगीचा ठाव घेते.समकालीन सभोवतालचे भयकारी चिंतन आहेच पण कवी म्हणून जी शब्दांची निष्ठा आहे ती अशी "बायकोला कवटाळून,घेतले नाही तितके कित्येक पटीने कवटाळले कवितेला....जगलेल्या क्षणांचे,रोमांच अंगी अन् भोवताल व्यापणारा कवितेचा स्वर...."ही कवितेचा मर्मग्राही आस्वादक स्वानंद या कवितेने दिला.'वर्तमानाच्या काठावर' ही कविता आत्मिक अस्वस्थता मांडते तर माणुसकी नामशेष होत चाललीये माणसातून.. माणुसकीचे बुरुजचं राहिले नाही,अनादी कालापासून कविता दडलेली असते, भोवताल व्यापलेली असते.तर 'मौनाचे गाभारे उताराच्या प्रतिक्षेत.मग कवी असा आतला भोवताल मनाला गुंडाळून घेतो.. इतकी आत्मिक भाष्य ही कविता करून जाते.आज काल हे विश्व विधेयक खंगाळून गेलं पण फट मात्र कायम आहे.कविता अशी, "फट दाराला जुनीच, अस्तित्वाचे नवे कोंभ. गावं हरवल्या नोंदीचे, कपाळी बाजार भोग"(पृष्ठ 62)कवी आपल्या गाव शिवारात उद्विग्न व्यवस्थेचं मनी मानसी कल्लोळाचा कोलाहल इतक्या सयंतपणे मांडतो की,ही एक सखेद वेदनेची कविता होऊन जाते.तरी वठलेल्या जिर्ण झालेल्या झाडाला मनस्वी पालवी फुटवी तसे हे भावनेचे अंतरंग कवीने मांडले आहे.गावखुरी गायगुरं दिसतं नाही.जुनी जानती माणसं या साऱ्या संकटाला भीत नाही तर हे होणारं आहे!.ऋतुचक्राचे पालटलेले स्वरूप पाहून काळाचा काळाकभिन्न विळखा म्हणजे ह्या कोलाहलात मरणयातना भोगाव्याचं लागणार आहे असे हे कोलाहलचे क्षणचित्रे भयभीत करतात.ही कविता चिंतनाच्या पटावर खोलवर रुजत जाते.एखादे गाणे मनाच्या खोल तळापर्यंत जाऊन त्याचा आर्त स्वर व्हावा अशी ही कविता मनाला हेलावून टाकते."झाडाला टांगला पिंजरा पानाफुलांशी बोलतो.आतला 'रावा' चोचीने भविष्य उद्याचे सांगतो "(पृष्ठ 96)ही कविता खोल तळ ढवळून काढणारी कविता आहे.हे या कवितेने श्रेयस आहे.कवी लवकुमार मुळे यांच्या सृजनशील स्नेहाळू भावनेचा हा कोलाहल दमदार अभिव्यक्तीची नांदी ठरावी ही सविनय शुभेच्छा.

**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**
**सम्पर्क:**-9975137337
**पुस्तक:-कोलाहलाचे क्षणचित्रे (कवितासंग्रह)**
**कवी लवकुमार मुळे**
**प्रकाशक : संजय जयप्रकाश सुरनर संगत प्रकाशन,**
**नांदेड**,5-
**प्रथम आवृत्ती** : 02 **आक्टोबर** 2025
**मुखपृष्ठ : कृष्णा डी टी पी आर्ट्स, नांदेड**
**किमत:-रुपये** 150/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


# हतनूर चापानेर जिल्हा परिषद गट गणांत रंगणार दुहेरी लढत



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तालुक्यातील जि.प.गटांत होणाऱ्या तुल्यबळ लढतीं पैकी एक रंगत आलेला जि.प. हतनूर हा गट, सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव असलेल्या या गटात अनेक उमेदवार रिंगणात असले तरी येथे दुहेरी लढत होण्याची शक्यता आहे.गेल्या पंचवार्षिक मध्ये हतनूर जि.प. गटात मा.मंत्री आ.बबनराव लोणीकर यांचे जावई किशोर नारायण पवार(भाजप) यांनी तर हतनूर गणात किशोर पवार(रायभान जाधव आघाडी), चापानेर गणात नंदू ढोले यांनी नेतृत्व केले होते. त्यामुळे भाजपने या गटावर वर्चस्व मिळविले होते. आता मात्र आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी भाजप ला मोठी ताकद पणाला लावावी लागणार आहे. या निवडणुकीत भाजप ने मा.जि.प.सदस्य किशोर नारायण पवार यांची पत्नी तथा आ.लोणीकर यांचि कन्या मिनाक्षी किशोर पवार यांना रिंगणात उतरविले आहे. मराठा आंदोलनातून उभारीस आलेले नेतृत्व, उद्योजक, समाजसेवक डॉ. अशोक पवार यांचे आमदारकी लढविण्याचे अपुर्ण राहिलेले स्वप्न जि.प. निवडणुकीत पुर्ण करण्यासाठी त्यांनी आपल्या मातोश्री कौशल्या विठ्ठल पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस च्या तिकीटावर ऊभे केले आहे. सोबतच पं.स.गणांत दिग्गज उमेदवार दिल्याने त्याचा मोठा फायदा त्यांना होऊ शकतो. कन्नड सह.साखर कारखान्याचे माजी चेअरमन पंडितराव वाळुंजे यांच्या पत्नी सुमनबाई वाळुंजे यांना शिवसेने कडून रिंगणात उतरविले आहे. मतदार संघात तगडे जनसमर्थन असलेले मा.आ.हर्षवर्धन जाधव यांनी वि.म.रायभान जाधव आघाडी च्या माध्यमातून अंबिका रामेश्वर वेताळ यांना उमेदवारी दिली. त्यामुळे या मतदार संघात तुल्यबळ लढत बघावयास मिळत आहे. हतनूर पं.स. गणात हतनूर चे मा.सरपंच कैलास अकोलकर, भाजपचे संतोष करवंदे, मा.पं.स.सदस्य किशोर पवार, टापरगाव च्या सरपंच रुपाली मोहिते, प्रगतशील शेतकरी संतोष जाधव हे तुल्यबळ तर चापानेर गणात भाजप च्या मंदाबाई बोलधने, शिवसेने चे शिवशांत बेडवाल, राष्ट्रवादी चे योगेश राजपूत, रायभान जाधव आघाडी चे युवराज बोरसे, यांच्यात सरळ लढत होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत खरे चित्र स्पष्ट होईल. कायम दुष्काळी सावटा खाली असलेल्या हतनूर उत्तर पश्चिम भागात कायम स्वरुपि सिंचन व्यवस्था, अपूरा विज पुरवठा, रस्त्यांची दुर्दशा, वन्यजीवांकडून होणारा उपद्रव, आदी प्रमुख समस्या कायम स्वरुपात आहेत. शिवना टाकळी मध्यम सिंचन प्रकल्प गटात असून ही अर्ध्याहून अधिक मतदार संघ तहानलेलाच आहे. शेतशिवार रस्ते कायमची डोकेदुखी ठरली आहे. विज वितरण, आरोग्य व्यवस्थेचा गलथान कारभार वेळोवेळी चव्हाट्यावर आला आहे. त्यामुळे याचि उत्तरे सत्ताधारी युती पक्षांबरोबरच आजिमाजि सदस्यांना मतदार विचारणार आहे.

## आनंदाने जगून घ्यावे

गरज म्हणून जपणे,माझा स्वभाव नाही..<br>
जे जे आहेत चांगले,ते माझ्या ह्दयात राही.

शत्रू असो की मित्र,सर्वांना जीव लावतो.<br>
संकटकाळात सर्वांच्या,तत्परतेने धावतो.

स्वार्थ सोडले की सारे,आपलेच होऊन जातात.<br>
आनंदी होऊन सारे,आपलेच गीत गातात.

गर्व सोडा आनंद वाटा, सुखाच्या येतील लाटा.<br>
सदा करावे दु:खाला,आनंदाने बाय बाय टाटा.

तुझे माझे काही नाही,आनंदाने जगून घ्यावे.<br>
जे जे आहे जवळ,ते ते सर्वांना वाटून द्यावे.

चूकभूल झाल्यास सदा,आनंदाने माफ करावे.<br>
निस्वार्थपणे जगताना,जीवनी सप्तरंग भरावे.

जाणून घ्यावे सर्वांनी,क्षणभरचे प्रवासी सारे.<br>
कळत नाही कुणाला,कधी निघून जाईल वारे.



**नागेश बोंतेवाड,**<br>
**छत्रपती संभाजीनगर**


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात ७७ वा गणतंत्र दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा लीगल अँड जनरल एज्युकेशन सोसायटीचे डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय आणि माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय यांनी एकत्रित गणतंत्र दिनाचे ध्वजारोहण कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात साजरा केला. महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ सुनीता बाजपाई आणि विधी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अपर्णा कोतापल्ले यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यानंतर उद्देशिकाचे वाचन झाले. कल्याणी दीक्षित हिने महाराष्ट्र गीत सादर केले. प्रा. शरद देशमुख यांनी भारतीय सजग नागरिकत्व जागर अभियान अंतर्गत, उपस्थितांकडून नागरिकत्वाची प्रतिज्ञा घेतली. प्रा रवींद्र परभाणे यांनी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत तंबाखू मुक्तीची शपथ उपस्थितांकडून घेतली. यावेळी सामूहिक कवायत व पथसंचालनाच्या समूहाचे कनिष्ठ महाविद्यालयातील कुमारी सपना मलिक हिने नेतृत्व केले. त्यासाठी प्रा. उज्वला सातदिवे व प्रा. शाम घोरतळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ अपर्णा कोत्तापल्ले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ मनीषा वाघमारे यांनी केले. यावेळी दोन्ही महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी ,शिक्षक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## बस मध्ये हरवलेले पॉकेट परत केल्यामुळे वाहक चालकाचा सत्कार



**कन्नड (अरुण थोरात) :** राज्य परिवहन महामंडळाच्या बस मधून प्रवास करतांना एका प्रवाशाचे हरवलेले पॉकेट, पुढच्या थांब्यावर शोधून,कागदपत्रे व रोख रकामेसह परत आणून देणाऱ्या वाहक व चालकाचा कन्नड येथे सत्कार करण्यात आला.सविस्तर हकीकत अशी की, कन्नड येथील रहिवासी कालिदास उपासनी हे छत्रपती संभाजीनगर नगर हुन कन्नडला MH २०-BL ६९३८ अंबेजोगाई - धुळे या बसने प्रवास करत होते.कन्नडला बस मधून उतरताना,ते बसले होते, त्याच असणावर त्यांचे पॉकेट पडले. बसमधून खाली उतरल्यावर ही बाब त्यांच्या लक्षात आली, तो पर्यंत बस पुढील प्रवासासाठी निघून गेली होती.पॉकेट मिळण्याची अशा सोडून ते, सहज विचारपूस करण्यासाठी वाहतूक नियंत्रक अंकुश गाडेकर यांच्या कडे गेले. श्री. गाडेकर यांनी आगार प्रमुख स्वाती बाखडे, स्थानक प्रमुख संघर्ष पगारे, अमोल भिंगारे यांच्या मार्गदर्शनात चाळीसगाव येथील वाहतूक नियंत्रक श्री. घुगे यांना संपर्क करून माहिती दिली. त्यानुसार अंबेजोगाई - धुळे बसचे वाहक विलास आरकडे व चालक दीनानाथ गुपटे यांनी सदर असणाजवळ जाऊन बघितले तर असणाखाली त्यांना पॉकेट सापडले. दुसऱ्या दिवशी त्यांनी अंबेजोगाईला परत जाताना कन्नड बस स्थानाकात श्री. उपासनी यांना बोलवून पॉकेट सर्व कागदपत्रे व रोख रक्कम सह परत दिले.यावेळी वाहक व चालक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अंकुश गाडेकर सह सुरक्षा रक्षक सीताराम चव्हाण व विनोद शेजवळ उपस्थित होते.यावेळी श्री. उपासणी म्हणाले की, अशा प्रामाणिक कर्मचाऱ्यांमुळे सार्वजनिक वाहतुकीवरील विश्वास अधिक दृढ होत,असून समाजासमोर एक सकारात्मक आदर्श निर्माण झाला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


## चॅम्पियन इंग्लिश स्कूल शाळांमध्ये ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** पडेगाव येथील चॅम्पियनइंग्लिश शाळेत 26 जनवरीभारतीय प्रजासत्ताक दिनी इतिहास अभ्यासक तथा छत्रपती संभाजीनगर येथील पर्यटन सहायक डॉ.शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते शाळेचा मुख्य ध्वजारोहण करण्यात आला तर यावेळी नगरसेविका सावित्रीबाई हिरालाल वाणी नगरसेवक श्री.गणेश लोखंडे हे प्रमुख अतिथी होते. प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला व मुलांना क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विध्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.चॅम्पियन स्कूल शाळ प्रजासत्ताक दिनानिमित्त संस्थेचे संस्थापक सय्यद रहेमान सय्यद ,अलीम सय्यद निसार सय्यद मुख्तार , अमजद पठाण,असलम प्रमुख उपस्थिती, हारून सय्यद,जाकीर सय्यद , सय्यद सलमान, राहुल वाणी ,राजू वाणी , गफूर पठाण, सलीम शेख, व मुख्याध्यापिका सरिता सातारकर, क्रीडाशिक्षक सुमित ढगे, आफरीन शेख, आफरीन खान, वैशाली खोतकर, मोनाली वाघ प्रीती पाखरे, पद्मिनी पाखरे, सायमा शेख, अक्सा शेख, नवी शेख, फरीन शेख, प्रेरणा वाघ, व सर्व शिक्षक गण उपस्थित होते व कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पडला.

## जिंतुर येथील क्युरीयस किड्स इंग्लिश स्कूल येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा



**जिंतुर (बी. डी. रामपूरकर) :** प्रजासत्ताक दिनानिमित्त क्युरिक्स किड्स इंग्लिश स्कूल सह्याद्री अकॅडमीच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण व विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष सिराज सिद्दिकी तर प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड. माधव विश्वनाथराव दाभाडे उपस्थित होते. व्यासपीठावर फौजदार विजय जाधव,गणेशराव तायडे काका, एल के अंभोरे सर , नारायण चौधरी सर, व्यवहारे सर , कामठेवार सर , पूजा जाधव मॅडम ,माधुरी तायडे मॅडम , पूजा प्रधान मॅडम व संचालक संजय माहूरकर सर, प्रशांत तायडे सर , अजय सोनुने सर व राहुल प्रधान सर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देश भक्तीवर गीत सादर करून कार्यक्रमास सुरुवात केली हे वैयक्तिक गीत सिनियर केजी मधील कुमारी अन्वी हाके हिने सादर केले त्याबद्दल प्रमुख आतिथींनी तिचे कौतुक करून तिला कार्यक्रमाचे अध्यक्ष सिराज सिद्दिकी यांच्या हस्ते प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात आले ॲड. माधव दाभाडे, यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व, व भारताची घटना याबाबत अतिशय साध्या व सोप्या शब्दात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तेसच यावेळी सिराज सिद्दीकी यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनंजय देशमुख, चंदू प्रधान, महेश आप्पा मुलंगे, भाग्यश्री आहेर, सोनाली सांगळे, आश्विनी चव्हाण, वंदना राठोड, आरती दराडे, शेख सर, व मोहिते मावशी यांनी परिश्रम घेतले

## डॉ. सौ. आय. बी. पी. महिला महाविद्यालयात जागतिक हिंदी दिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. आय.बी.पी. महिला महाविद्यालयात दिनांक 10 जानेवारी 2026 रोजी जागतिक हिंदी दिन या निमित्ताने हिंदी विभागाच्या वतीने पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन अत्यंत सन्मानपूर्ण वातावरणात करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई उपस्थित होत्या. यावेळी आय.क्यू.ए.सी. प्रमुख डॉ. पराग चौधरी, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. मनीषा वाघमारे, हिंदी विभागप्रमुख डॉ. रमा दूधमांडे तसेच कनिष्ठ विभागाच्या डॉ. शोभा हनवते यांची प्रमुख उपस्थिती लाभली.जागतिक हिंदी दिनाच्या निमित्ताने आयोजित काव्यवाचन व श्रुतलेखन स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.श्रुतलेखन स्पर्धेतप्रथम क्रमांक – पायल शुक्ला (तृतीय वर्ष बी.ए.),द्वितीय क्रमांक – अंजली शिंदे (बारावी वाणिज्य),तृतीय क्रमांक – अनुजा काळे (तृतीय वर्ष बी.ए.) यांनी पटकावला.काव्यवाचन स्पर्धा (वरिष्ठ विभाग)प्रथम क्रमांक – पायल शुक्ला (तृतीय वर्ष बी.ए.),द्वितीय क्रमांक – माया साळवी (द्वितीय वर्ष),तृतीय क्रमांक – लक्ष्मी ओंकार (प्रथम वर्ष बी.ए.) यांनी मिळवला.काव्यवाचन स्पर्धा (कनिष्ठ विभाग)प्रथम क्रमांक – हर्षा शेवाळकर (अकरावी वाणिज्य),द्वितीय क्रमांक – जान्हवी कुलकर्णी (बारावी विज्ञान),तृतीय क्रमांक – अंजली शिंदे (बारावी वाणिज्य) यांनी पटकावला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुचित्रा कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. पूजा मुठ्ठे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

## वीर अब्दुल हमीद ट्रस्ट तर्फे हीना नगर येथे प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील हीना नगर येथे वीर अब्दुल हमीद चॅरिटेबल ट्रस्टच्या सदस्यांनी प्रजासत्ताक दिनी राष्ट्रीय ध्वज फडकावून मानवंदना दिली. या वेळी उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या समारंभात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये शालेय विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम, संचलन, आणि अन्य आकर्षक कार्यक्रमांचा समावेश होता.प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने ट्रस्टच्या सदस्यांनी देशाच्या प्रगतीसाठी आणि एकतेसाठी काम करण्याचा मानस व्यक्त केला. यावेळी मोहसीन मुल्ला , शमसु शेख, समीर शेख, अन्वर शेख, भाई वसीम, अतीक पठाण, राज मोहम्मद, आमीर शेख, असलम शेख, रोशन शेख यांसह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. मागील ५ वर्षापासून राष्ट्रीय सणाच्या प्रसंगी नियमितपणे परीसरात ध्वजारोहण केले जात असल्याची माहिती माजी सैनिक नायब सुभेदार जहीर बेग यांनी दिली. ही परंपरा वीर अब्दुल हमीद चॅरिटेबल ट्रस्ट अखंडितपणे चालू ठेवणार असल्याचे त्यांनी मनोगत व्यक्त केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


## जि. प. प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा




**उंबरखेडा (कृष्णा शिंदे) :** जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. गावामधून प्रभात फेरी काढण्यात आली. गावातील ज्येष्ठ मान्यवर, सरपंच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व ग्रामस्थ यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी गावातील सरपंच, सदस्य शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष , सदस्य पोलीस पाटील ग्रामस्थ अंगणवाडी ताई आशा सेविका आरोग्य विभागातील कर्मचारी, महिला भगिनी ,पालक ,माजी विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री अंकुश बाबु राठोड होते.शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. भारतीय तिरंगा राष्ट्रध्वजाला सर्वांनी मानवंदना दिली. याप्रसंगी भारतीय सैन्य दलातील पॅरा कमांडो चे प्रशिक्षण पूर्ण केलेले उंबरखेडा येथील श्री. रोशन राजेश जाधव यांचा शाळेचे मुख्याध्यापक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. उमेश हुकुमदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त शाळेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणातून प्रजासत्ताक दिन ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, संविधान, लोकशाही, नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य ,भ्रष्टाचार मुक्ती अशा विविध विषयांवर भाषणातून आपले विचार व्यक्त केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी वैयक्तिक व सामूहिक नृत्य सादर करून कार्यक्रमाची रौनक वाढवली. उपस्थित ग्रामस्थांनी ही त्यांच्या कला कौशल्याबद्दल भरघोस बक्षिसे दिली. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त शाळेमध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वाटप शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन पांडुरंग सुपेकर यांनी केले. प्रजासत्ताक दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांची संगीतमय कवायत धनंजय अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेमध्ये निरक्षर मुक्ती ची शपथ घेण्यात आली. अतुल दसोडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शा.पो. आ.शिजवणारे सुशीला ताई व सचिन भाऊ यांच्याकडून सर्व विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक प्रवीण शिंदे सर्व शिक्षक ,उमेश हुकुमदार ,पांडुरंग सुपेकर, मनोज रायसिंगे ,प्रदीप पवार, फुरकान शेख ,लक्ष्मण गझलवाड, चंद्रकांत बामनिया, अतुल दसोडे तसेच अंशकालीन निदेशक प्रवीण राठोड ,धनंजय अहिरे ,अंकुश राठोड या सर्वांनी परिश्रम घेतले.

## केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प येथे प्रजासत्ताक दिनाचा भव्य सोहळा



**नाशिक (प्रतिनिधी):** शहरातील तोफखाना केंद्र परिसरात असलेल्या पीएमश्री केंद्रीय विद्यालय, नाशिक रोड कॅम्प येथे प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी संपूर्ण विद्यालय परिसर देशभक्तीच्या भावनेने भारलेला दिसून आला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून तोफखाना केंद्राचे मानव संसाधन विकास केंद्र अधिकारी लेफ्टनंट कर्नल विक्रांत काळे हे होते. त्यांनी ध्वजारोहण करून एनसीसी परेडची सलामी स्वीकारली. आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांमधील शिस्त, आत्मविश्वास व देशप्रेमाची भावना यांचे कौतुक केले. तसेच विद्यालयातील शिक्षकांनी राबवलेल्या शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांचेही त्यांनी विशेष अभिनंदन केले. प्राचार्य गजराज मीना यांनी कर्नल काळे यांचे विद्यालयात विकसित केलेले हरित रोप देऊन स्वागत केले. स्वागतपर भाषणात त्यांनी विद्यालयाच्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.सांस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात विद्यार्थ्यांच्या मधुर गीताने झाली. प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक मराठी लोकनृत्याने प्रेक्षकांना टाळ्या वाजवण्यास भाग पाडले. माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेले मनमोहक योगनृत्यास उपस्थित विद्यार्थी, पालक व पाहुण्यांनी मोठ्या उत्साहाने दाद दिली. या कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रती कर्तव्य, एकता व जबाबदारीचा संदेश देण्यात आला.निहारिका शुक्ला, सृष्टी इन आणि इंदु कुमार सनबोईर यांनी कार्यक्रमाचे मंचसंचालन केले. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनी मृण्मयी शिंदे, खुशी सिंग आणि तृप्ती विश्वकर्मा यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अमित कुमार शुक्ला, कल्पना शिंदे, रोहित गोड, सुदर्शन गुप्ता, शैलेंद्र यादव, पूजा यादव, अविनाश पवार, आरीफ बेग, सागर काठोळे, महादेव इथारे, स्वाती सोनुले, सिमरन चौरसिया, अरविंद लोखंडे, शुभम यादव यांच्यासह सर्व शिक्षकांनी मोलाचे योगदान दिले.ज्येष्ठ शिक्षिका उज्ज्वला चांदोरकर यांनी सर्व पाहुणे, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे सहकार्याबद्दल आभार मानले.

## महाराष्ट्र शासनाच्या वतीने राजीव गांधी महाविद्यालयास पुरस्कार

**करमाड :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र "करिअर कट्टाच्या" वतीने राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी भारतीय संस्कृती संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजीव गांधी महाविद्यालय, करमाड यांना महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या "करिअर कट्टा" या उपक्रमांतर्गत शैक्षणिक वर्षे २०२५-२६ मध्ये विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. प्राचार्य डॉ.सदाशिव मुळे यांना ऊत्कृष्ट प्राचार्य म्हणुन पुरस्कार जाहीर झालेला आहे तर डॉ.किशोर काळे यांना राज्यस्तरीय स्पर्धा नियोजन समितीमध्ये विशेष कामगिरीबद्दल सन्मान पुरस्कार मिळालेला आहे. त्याचबरोबर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महाविद्यालयीन स्पर्धेत उत्कृष्ट करिअर संसद म्हणुन महाविद्यालयास द्वितीय क्रमांक प्राप्त झालेला आहे.महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रभर विविध महाविद्यालयात करियर कट्टा हा उपक्रम राबविला जातो. महाविद्यालयाला मिळालेल्या विविध पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष अॅड.लक्ष्मणराव मनाळ, सचिव श्रीमती.डॉ. शैलजा जोशी,IQAC Co-ordinator प्रा.डॉ.नरेश डहाळे, प्रा.डॉ.कालिदास फड, प्रा.डॉ.बाळासाहेब लिहिणार, प्रा.डॉ.आश्विनीकुमार चिंचोलीकर, प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दांडगे, डॉ सुखदेव पोटदुखे, प्रा. हरिदास होळकर, डॉ.ललित गोल्डे, प्रा. रामदास घोडके, प्रा.प्रशांत माठे, डॉ इम्रान पठाण, डॉ. नानासाहेब लावंड, प्रा. लक्ष्मण खरात,प्रा. गणेश कुऱ्हाडे, प्रा. अर्जुन चव्हाण व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


## तत्कालीन बोलीभाषेमुळेच मराठी अभिजात झाली - डॉ. विक्रम राठोड




**चिमणपीरवाडी :** "दिडदोनहजार हजारवर्षापुर्वी भारतीय दख्खन उपखंडात ज्या ज्या मराठी सदृश्य बोलीभाषा बोलल्या जात होत्या त्यांच्या सामर्थ्यामुळेच आज मराठी अभिजात म्हणून गौरविले जाते" असे विचार मराठी भाषा पंधरवडा निमित्ताने डॉ. विक्रम राठोड यांनी व्यक्त केले. मराठी भाषा पंधरवडा मराठी बोली गौरव निमित्ताने ग्रामीण भागातील बोलीतील वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी, अनुभवण्यासाठी प्रत्यक्ष ऐकण्यासाठी, संवादसाधण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी छत्रपती संभाजीनगर व खुलताबाद सिमेवरील डोंगराळभागातील चिमणपूरवाडी येथे गेले. गावकऱ्यांशी संवाद, लोकभाषा, बोली, लोकगीत, लोकसंगीताचा आस्वाद घेत शालेय विद्यार्थ्यांशी गप्पांचा कार्यक्रम रंगला . यावेळी जि.प.प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक रोहिदास पवार यांनी भजनावलीच सादर केली. तर शासकीय विद्यानिकेतन मधील डॉ. विक्रम राठोड यांनी मराठीच्या बोलीची पुरातनता उलगडत महानुभाव साहित्य, प्राकृत संत ज्ञानेश्वरांची मराठी बोलीत अवतरलेली भगवतगीता अर्थात ज्ञानेश्वरी, वऱ्हाडी डांगी कोकणी मराठवाडी खानदेशी अशा ग्रामीण बोलीच्या तत्कालीन भाषा व वापरामुळेच अभिजात मराठी अभिजात ठरल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख व उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडे यांनी केले. यावेळी शाळेतील मुलींनी बंजारा लोकगीतेही सादर केली.

कार्यक्रमास डॉ. आर. बी. घोडे, डॉ. सतीश वाघमारे,डॉ.गौतम घाडगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन प्रा.नवनाथ गोरे यांनी केले तर आभार शाळेतील शिक्षक श्री.उमेश वीर यांनी व्यक्त केले.कार्यक्रमास शालेय तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी , गावकरी व शिक्षक उपस्थित होते.

## केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प येथे अनोखा उपक्रम; विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये मैत्रीपूर्ण क्रिकेट सामना रंगला



**नाशिक (प्रतिनिधी) :** प्रजासत्ताक दिनाच्या शुभ प्रसंगी शहरातील तोफखाना केंद्र परिसरातील पीएम श्री केंद्रीय विद्यालय, नाशिक रोड कॅम्प येथे एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम पाहायला मिळाला. शाळेने विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये एक मैत्रीपूर्ण क्रिकेट सामना आयोजित केला, ज्यामुळे संपूर्ण कॅम्पसमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या विशेष कार्यक्रमाचा उद्देश परस्पर सुसंवाद, सांघिक भावना आणि विद्यार्थी आणि शिक्षकांमधील निरोगी संबंध मजबूत करणे हा होता. विद्यालय प्रबंधन समिती अध्यक्ष व तोफखाना केंद्राचे कमांडंट एन आर पाण्डेय यांच्या द्वारे नामनिर्देशित मानव संसाधन विकास केंद्र अधिकारी लेफ्टनंट कर्नल विक्रांत काळे यांनी नाणेफेक केली. टीचर इलेवन संघाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. 8 षटकांच्या या सामन्यात कर्णधार तुषार वारडे आणि प्राचार्य गजराज मीना यांनी डावाची सुरुवात केली. टीचर इलेवन संघाने ५ गडी गमावून स्टुडंट इलेवन संघाला १०४ धावांचे लक्ष्य दिले. प्राचार्य गजराज मीना ४९ धावांवर नाबाद राहिले. तथापि स्टुडंट इलेवन ने ४ विकेट गमावून अटीतटीच्या या सामन्यात रोमांचक विजय मिळवला. दोन्ही संघांनी या क्रिकेट सामन्यात मोठ्या उत्साहाने आणि क्रीडा वृत्तीने भाग घेतला. शिक्षक आणि विद्यार्थी मैदानावर एकमेकांना प्रोत्साहन देत होते, ज्यामुळे खेळाचे वातावरण अत्यंत आनंददायी बनले. शाळेचे प्राचार्य आणि शिक्षकांनी या उपक्रमाचे वर्णन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने एक अर्थपूर्ण पाऊल म्हणून केले. प्राचार्यांनी सांगितले की अशा कार्यक्रमांमुळे केवळ शारीरिक आरोग्याला चालना मिळत नाही तर शिस्त, सहकार्य आणि परस्पर आदर यासारख्या मूल्यांनाही बळकटी मिळते. सामन्याच्या शेवटी सर्व खेळाडूंचे कौतुक करण्यात आले आणि क्रीडा वृत्तीचा संदेश देण्यात आला. इयत्ता बारावीचा विद्यार्थी आयुष याला त्याच्या ६४ धावांच्या खेळीसाठी लेफ्टनंट कर्नल विक्रांत काळे यांच्या हस्ते सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.कल्पना शिंदे, आरीफ बेग, ओंकार काकुस्ते, अमृत बागुल यांनी पंच, स्कोअरर आणि समालोचक म्हणून काम पाहिले. प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित केलेला हा अनोखा क्रिकेट सामना शाळेसाठी एक संस्मरणीय अनुभव ठरला.

## बिल्डा येथे लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा; महाविद्यालयात मान्यवरांची मांदियाळी








**बिल्डा :** मेहेर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित , भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय बिल्डा ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर येथे ७७वा भारतीय प्रजासत्ताक दिन आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला...आज सकाळी ठिक ७:५० वाजता महाविद्यालयाच्या इमारतीवर, प्राचार्य संतोष पुंडगे सर यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले...या प्रसंगी गावातील जेष्ठ नागरिक व पमुख पाहुणे म्हणून श्री.साहेबराव गायकवाड, मा.सरपंच श्री.सुदामभाऊ मते गावचे सरपंच श्री.सोमनाथ पाटील मते तसेच देवगिरी सहकारी साखर कारखान्याचे मा.संचालक श्री.ज्ञानेश्वर पाटील मते ,उपसरपंच श्री. एजाज शाहा, श्री. आकाश गायकवाड श्री.नानासाहेब बोरसे श्री.सचिन मते श्री.योगेश पेटारे श्री. हकीम शाहा व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणी पालक विद्यार्थी इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.....!!

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ जानेवारी २०२६


# “न्याय, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन : सर बदरुद्दीन तैयबजी”



२८ जानेवारी हा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापना दिनाचा ऐतिहासिक दिवस आहे. या निमित्ताने, भारतीय न्यायव्यवस्थेच्या घडणीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या काही व्यक्तिमत्त्वांचे स्मरण करणे आवश्यक ठरते. अशा व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे सर बदरुद्दीन तैयबजी.भारतीय न्यायव्यवस्था आणि राष्ट्रनिर्मितीच्या प्रवासात त्यांचे योगदान केवळ पदांच्या चौकटीत न अडकता मूल्यांच्या पातळीवर इतिहासात खोलवर कोरले गेले आहे. सर बदरुद्दीन तैयबजी हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक. बॉम्बे उच्च न्यायालयाचे पहिले भारतीय मुख्य न्यायाधीश म्हणून त्यांनी इतिहास घडवला; परंतु त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे, त्यांनी धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि कायद्याचे राज्य या मूल्यांना स्वातंत्र्यपूर्व भारतात सामाजिक व राजकीय अधिष्ठान दिले. आज जेव्हा राष्ट्रनिर्मितीचा इतिहास पुन्हा तपासण्याची गरज प्रकर्षाने जाणवते, तेव्हा तैयबजी यांचे कार्य केवळ स्मरणासाठी नव्हे, तर विचारासाठीही महत्त्वाचे ठरते. स्वातंत्र्यपूर्व भारतात राजकीय आणि प्रशासकीय अधिकार प्रामुख्याने वसाहतवादी सत्तेच्या चौकटीत केंद्रीत असताना, भारतीय समाजात आधुनिक मूल्यांची पायाभरणी करणे हे आव्हानात्मक कार्य होते. अशा परिस्थितीत सर बदरुद्दीन तैयबजी यांनी केवळ न्यायालयीन कर्तव्यापुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही. कायद्याच्या अभ्यासातून मिळालेली विवेकबुद्धी, सामाजिक वास्तवाचे भान आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाची जाणीव या आधारे त्यांनी शहर प्रशासन, राष्ट्रीय राजकारण आणि समाजसुधारणा या क्षेत्रांत सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या कार्याचा हा बहुआयामी विस्तारच पुढे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला न्यायाधीशाच्या चौकटीपलीकडे नेऊन आधुनिक भारताच्या घडणीत सहभागी करणारा ठरतो.

**प्रारंभिक जीवन आणि वैचारिक जडणघडण**

१० ऑक्टोबर १८४४ रोजी गुजरातमधील कॅम्बे (आजचे खंभात) येथे जन्मलेले बदरुद्दीन तैयबजी हे व्यापारी कुटुंबातील असले, तरी त्यांच्या घराण्याची ओळख केवळ आर्थिक संपन्नतेपुरती मर्यादित नव्हती. विद्वत्ता, धार्मिक सहिष्णुता आणि आधुनिक विचार यांचा समतोल संगम हे त्यांच्या कौटुंबिक संस्कारांचे वैशिष्ट्य होते. वडील तैय्यब अली भाय मियाँ हे दूरदृष्टीचे व्यापारी, तर आई अमिना बीबी या धार्मिक विद्वान मेहर अली यांच्या कन्या होत्या. या वातावरणामुळे लहानपणापासूनच तैयबजी यांच्यात ज्ञान, विवेक आणि सार्वजनिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली. त्या काळात परदेशात शिक्षण घेणे ही धाडसी बाब मानली जात होती; तरीही कुटुंबाने शिक्षणाला प्राधान्य दिले. सर्वच भावंडे उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेली. मोठे बंधू कमरुद्दीन तैयबजी हे इंग्लंडमध्ये नोंदणीकृत झालेले पहिले भारतीय सॉलिसिटर ठरले. याच परंपरेतून बदरुद्दीन तैयबजी यांनी कायद्याचा मार्ग स्वीकारला. लंडन विद्यापीठ आणि मिडल टेंपलमध्ये शिक्षण घेत असताना दृष्टीदोषामुळे त्यांना काही काळ खंड पडला; मात्र त्यांनी शिक्षण पूर्ण केले. १८६७ मध्ये ते बॅरिस्टर झाले आणि बॉम्बे उच्च न्यायालयात वकिली करणाऱ्या पहिल्या भारतीयांपैकी एक ठरले — जो त्यांच्या कारकिर्दीतील आणि भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

**न्यायासनापर्यंतचा ऐतिहासिक प्रवास**

बॉम्बे उच्च न्यायालयात वकिली सुरू केल्यानंतर बदरुद्दीन तैयबजी यांनी अल्पावधीतच आपली विद्वत्ता, सचोटी आणि संतुलित विवेक यांची ठळक छाप उमटवली. कायद्याचा सखोल अभ्यास, तर्कशुद्ध मांडणी आणि नैतिक अधिष्ठान यांमुळे त्यांची ओळख केवळ कुशल वकील म्हणून नव्हे, तर न्यायव्यवस्थेतील विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व म्हणून निर्माण झाली. या गुणवत्तेच्या आधारावर १८९५ मध्ये त्यांची बॉम्बे उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती झाली. या नियुक्तीसह ते पहिले मुस्लीम आणि तिसरे भारतीय न्यायाधीश ठरले. सात वर्षांनंतर, १९०२ मध्ये, त्यांनी इतिहास घडवत बॉम्बे उच्च न्यायालयाचे पहिले भारतीय मुख्य न्यायाधीश होण्याचा मान मिळवला. हा केवळ वैयक्तिक गौरव नव्हता; तर भारतीयांना प्रशासनिक आणि न्यायिक क्षमतेपासून वंचित ठेवणाऱ्या वसाहतवादी मानसिकतेवर दिलेले सडेतोड उत्तर होते. त्यांच्या कार्यामुळे न्यायालयीन स्वायत्तता, कायद्याचे राज्य आणि समान न्याय या मूल्यांची बीजे रोवली गेली, ज्याचाच पुढे स्वतंत्र भारतातील सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेत परिपाक झाला.

**शहर प्रशासनात लोकांचा आवाज : राजकीय प्रवासाची सुरुवात**

१९व्या शतकातील मुंबईचे शहर प्रशासन प्रामुख्याने एका कमिशनरकडे केंद्रीत होते आणि लोकप्रतिनिधित्वाला फारसा वाव नव्हता. पहिल्या कमिशनर आर्थर क्रॉफर्ड यांच्या कारभारात आर्थिक उधळपट्टी, वाढता करभार आणि प्रशासकीय मनमानी यांविषयी असंतोष वाढत गेला. या पार्श्वभूमीवर १८७१ मध्ये शहरात जनक्षोभ उफाळून आला. या आंदोलनात अवघ्या २६व्या वर्षी बदरुद्दीन तैयबजी यांनी निर्णायक भूमिका घेतली. आपल्या पहिल्याच सार्वजनिक भाषणात त्यांनी नियुक्तीपद्धतीऐवजी निवडणुका आणि लोकप्रतिनिधी संस्थांची स्पष्ट मागणी केली. त्या काळात हा विचार अत्यंत धाडसी आणि पुढे जाणारा होता. याच चळवळीच्या परिणामी मुंबई टाउन कौन्सिलची (मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन) स्थापना झाली आणि १८७३ मध्ये तैयबजी त्याचे सदस्य म्हणून निवडून आले. पुढील दशकभर त्यांनी नागरी स्वराज्य, आर्थिक शिस्त आणि लोकहितप्रधान प्रशासन यांचा सातत्याने आग्रह धरला. या अनुभवातूनच त्यांच्या राजकीय विचारांना दिशा मिळाली आणि सार्वजनिक जीवनातील त्यांचा प्रवास अधिक व्यापक झाला.

**काँग्रेस आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रारंभीच्या वाटचालीत सर बदरुद्दीन तैयबजी यांची भूमिका महत्त्वपूर्ण होती. ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम यांच्यासह त्यांनी काँग्रेसच्या स्थापनेच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला आणि ही संस्था केवळ प्रांतीय किंवा विशिष्ट वर्गापुरती मर्यादित न राहता अखिल भारतीय राष्ट्रभावनेचे व्यासपीठ ठरावी, असा आग्रह धरला. १८८५ मध्ये मुंबईत झालेल्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात ते सक्रिय सहभागी होते, तर त्याचे अध्यक्षपद डब्ल्यू. सी. बॅनर्जी यांनी भूषवले. १८८७ मध्ये मद्रास येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर बदरुद्दीन तैयबजी काँग्रेसचे पहिले मुस्लीम अध्यक्ष ठरले. हा प्रसंग केवळ व्यक्तीगत गौरवाचा नव्हता, तर भारतीय राष्ट्रवादाच्या धर्मनिरपेक्ष आणि समावेशक स्वरूपाचा ठोस संदेश देणारा होता. राष्ट्रीय राजकारणात धर्माधारित भेदांऐवजी घटनात्मक मार्ग, संवाद आणि परस्पर विश्वास यांवर भर देणाऱ्या नेतृत्वाचे प्रतीक म्हणून तैयबजी यांची ओळख निर्माण झाली. बदरुद्दीन तैयबजी यांनी कधीही धर्माचा वापर राजकीय ध्रुवीकरणासाठी केला नाही. उलट, त्यांनी मुस्लीम समाजाला राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्याचा मार्ग दाखवला.

**समाजसुधारणा आणि स्त्रीशिक्षण**

सर बदरुद्दीन तैयबजी यांना हे स्पष्टपणे जाणवले होते की, राजकीय हक्कांची प्राप्ती ही समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पुरेशी नसून शिक्षण आणि सामाजिक सुधारणा या त्याच्या अपरिहार्य पूर्वअटी आहेत. या भूमिकेतून १८७६ मध्ये त्यांच्या पुढाकाराने मुंबई येथे स्थापन झालेली अंजुमन-ए-इस्लाम ही संस्था मुस्लीम समाजातील आधुनिक शिक्षणाच्या प्रसारासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरली. या संस्थेचा उद्देश धार्मिक शिक्षणापुरता मर्यादित न ठेवता, आधुनिक भाषा, विज्ञान आणि व्यावहारिक ज्ञान यांचा समावेश करणारे शिक्षण उपलब्ध करून देणे हा होता. मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर त्यांनी दीर्घकाळ कार्य करत उच्च शिक्षणाच्या रचनेविषयी मोलाचे योगदान दिले. तसेच इस्लाम क्लब आणि इस्लाम जिमखाना यांसारख्या संस्थांमधील सहभागातून त्यांनी सामाजिक संवाद वाढवण्याचा आणि विविध समाजघटकांमधील दुरावा कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यांची समाजसुधारणेची भूमिका टोकाची किंवा संघर्षप्रधान नसून, संवाद, विवेक आणि संस्थात्मक बदलांवर आधारित होती. त्यांच्या शैक्षणिक विचारसरणीतील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे स्त्रीशिक्षणाविषयीची त्यांची ठाम आणि तर्काधारित भूमिका. १९व्या शतकातील भारतीय समाजात—विशेषतः मुस्लीम समाजात—मुलींच्या शिक्षणाला मोठ्या प्रमाणावर विरोध असताना, त्यांनी निर्भीडपणे मांडले की स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाची नैतिक आणि बौद्धिक प्रगती शक्य नाही. त्यांच्या मते, स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर ठेवणे म्हणजे समाजाच्या अर्ध्या शक्तीला निष्क्रिय ठेवण्यासारखे आहे. स्त्रीशिक्षणाला पाश्चिमात्य प्रभावाचे अंधानुकरण म्हणून नाकारले जात असताना, तैयबजी यांनी धार्मिक संदर्भाच्या आधारे स्पष्ट केले की इस्लाममध्ये ज्ञानार्जनावर कोणताही लिंगभेद मान्य नाही. त्यामुळे आधुनिक विषयांचे शिक्षण, भाषा शिक्षण आणि व्यावहारिक ज्ञान हे स्त्रियांनाही उपलब्ध झाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. हा दृष्टिकोन समाजसुधारणेपुरता मर्यादित न राहता, आधुनिक भारताच्या बौद्धिक आणि सामाजिक पायाभरणीत महत्त्वाचा ठरतो.

१९०६ मध्ये लंडनमध्ये हृदयविकाराने त्यांचे निधन झाले. पत्नीच्या शेजारीच दफन व्हावे, ही त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांचे पार्थिव मुंबईत आणण्यात आले. आज सार्वजनिक जीवनात जेव्हा कायद्यावरील निष्ठा, संस्थात्मक प्रामाणिकपणा आणि सामाजिक सलोखा या मूल्यांची उणीव प्रकर्षाने जाणवते, तेव्हा सर बदरुद्दीन तैयबजी यांचे आयुष्य आणि विचार अधिकच अर्थपूर्ण ठरतात. त्यांनी न्याय, धर्मनिरपेक्षता आणि शिक्षण यांना केवळ तत्त्वज्ञान म्हणून नव्हे, तर समाजपरिवर्तनाची साधने म्हणून पाहिले. पद, धर्म किंवा समाजघटक यांपलीकडे जाऊन राष्ट्रीय एकात्मतेचा विचार मांडणारे हे व्यक्तिमत्त्व इतिहासात दुर्लक्षित राहिले असले, तरी आधुनिक भारताच्या वैचारिक घडणीत त्यांचा वाटा मूलभूत आहे. त्यामुळे तैयबजी यांचे स्मरण हे केवळ भूतकाळाकडे पाहण्यापुरते न राहता, आजच्या आणि उद्याच्या भारतासाठी मार्गदर्शक ठरते. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापना दिनी, न्याय आणि सामाजिक परिवर्तनाच्या या अग्रदूताचे स्मरण करणे हीच खरी कृतज्ञता ठरेल.




**शेख इरफान अय्युब**
(सहा.प्राध्यापक इतिहास विभाग)
डॉ. रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन
छत्रपती संभाजीनगर,४३१००१
ईमेल- iasirfan82@gmail.com
Mob. 9309589278